# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

आो.मिडीया

8

1641

20/12/17

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFACTION/ 84 /2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :—26122017
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

डोंबिवली (पूर्व) पाथर्ली रोडवर शेलार चौक ते साईबाबा मंदिर—आईस फॅक्टरी दरम्यान रोडवर शाळा, व्यावसायीक दुकाने, दवाखाने, मंगलकार्यालय असल्याने त्या ठिकाणी येणारे नागरीक त्यांची वाहने रोडचे दोन्ही बाजुस पार्कींग करीत असल्याने वाहतुकीस अडथळा होत आहे. यास्तव या रोडवरील व परिसरातील वाहतुक सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. —११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, मी अमित का.काळे, पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा, ठाणे शहर खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :—

१) पाथर्ली रोडवरील शांतीनगर तसेच आचार्य भिसे गुरूजी शाळेच्या मुख्य गेटपासुन रोडच्या दोन्ही बाजुस १५ मीटर पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनासाठी नो पार्कींग ( No Parking ) करण्यात येत आहे.

२) पाथर्ली रोडवर शेलार चौक ते साईबाबा मंदिर — आईस फॅक्टरी दरम्यान दुचाकी व चारचाकी (कार,जिप) या वाहनाना सम विषम तारखेप्रमाणे (पी—१,पी—२) रोडलगत **समांतर पार्किंग** करण्यास मुभा देण्यात येत आहे.

३) पाथर्ली रोडला पाथर्ली गांवाकडे, संत नामदेव पथ, अंबिकानगर, अयोध्यानगरी, बालाजी मंदिर रोड, एमआयडीसी असे क्रॉस रोड गेले आहेत. या क्रॉस रोडचे चौकात रोडलगत ६ मीटर पर्यंत वाहने (कॉर्नर पार्कींग) करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत असुन कोणाची काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरूपात पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा, कार्यालय वाहतुक विभाग, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ अथवा पोनि डोंबिवली वा.उपविभाग येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही सुचना अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरूपात अंमलात राहील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही .

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा
ठाणे शहर

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे.
२/— सदरचे अधिसचुनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका,कल्याण.

Scanned by CamScanner